**सोलापूर महानगरपालिका,सोलापूर**
घनकचरा व्यवस्थापन विभाग
सह्याद्री शॉपिंग सेंटर,जुना एम्प्लॉयमेंट चौक,सोलापूर-४१३००२

जा.क्र./घकव्य/ ६२२ दि. १६/०३/२०२६

स्वच्छता ही सेवा

## निविदा सूचना

मा.महाराष्ट्र शासन २०११ चा अध्यादेश क्र.१२ नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई दि.२१ मे २०२१ सोलापूर महानगरपालिका, सोलापूर घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता खालील कामाकरिता दोन लिफाफा दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ. क्र | कामाचे वर्णन | टेंडर र.रु. | बयाणा र.रु. १% | सुरक्षित र.रु.२% | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत ODF++ दर्जा राखण्यासाठी घनकचरा व्यवस्थापन विभागा अंतर्गत सार्वजनिक / सामुदायिक शौचालय सर्वोत्तम करणेकामी आवश्यक साहित्य खरेदी करणे.<br>१.आरसे १.५ × २ चे<br>२. लाल कचरा पेटी (झाकणबंद)<br>३.निळी कचरा पेटी (झाकणबंद)<br>४.हँडवॉश लिक्विड बॉटल लहान ५० मी.ली.<br>५.एअर फ्रेशनर पाकीट<br>६.पेपर नॅपकिन बंडल<br>७.वायपर<br>८.शौचालय ब्रश<br>९. कंगवा<br>१०.लाईफबॉय साबण १००ग्राम | ९,५१,८७५/- | ९,५५०/- | १९,१००/- | ५००/- | वर्क ऑर्डर दिल्यापासून ४ दिवस |

टिप : १) पुरवठाधारक यांनी प्रति नगाचे दर द्यावयाचे आहेत.
२) टेंडर दर भरणेपूर्वी उपरोक्त साहित्याचा नमुना घनकचरा व्यवस्थापन विभागाकडे सादर करणे व मुख्य सफाई अधीक्षक यांचेकडून मान्य करून घेणे बंधनकारक राहील.

शर्ती व अटी :
१) दरपत्रके दि .16 /03 /२०२६ ते दि.20/ 03/२०२६ पर्यंत दुपारी १.०० वाजेपर्यंत मुख्य लेखापाल कार्यालय मनपा येथे सादर करावयाचे आहे .
२) बयाना र.रु.९,५५०/- दि. 16/03/२०२६ ते दि. 18/03 /२०२६अखेर दु.१ .०० वाजेपर्यंत मुख्य लेखापाल कार्यालयात मनपा येथे रोखीने भरावयाचे आहे .
३) २ % सुरक्षित रक्कम वर्क ऑर्डरच्या वेळी करार पत्र करतेवेळी मनपा कोषागृहात भरावयाची आहे.
४) दरपत्रक लेटर पॅडवर नमूद करून बंद पाकिटात सादर करावयाचे आहेत . बंद पाकीट क्र . १ तांत्रिक लिफाफा खालील आवश्यक कागदपत्रे, बंद पाकीट क्र .२ वित्तीय लिफाफा.
५) द्यावयाचे दर हे सर्व शासकीय करासहित द्यावयाचे आहेत .

| लिफाफा क्र.१ तांत्रिक लिफाफा | लिफाफा क्र.२ दरपत्रक लिफाफा |
|---|---|
| १) Pancard<br>२) शॉपअॅक्ट लायसन<br>३) मुख्य सफाई अधीक्षक यांचे साहित्याचा नमुना योग्य व मान्य असल्याचा दाखला. | १.संस्थेच्या लेटर पॅडवर सही शिक्क्यानिशी दरपत्रक देणेत यावे. |

(शशिकांत भोसले)
सहा. आयुक्त तथा नियंत्रण अधिकारी
घनकचरा व्यवस्थापन विभाग

# (निविदा दरपत्रके) अटी व शर्ती

१) टेंडर भरण्यापूर्वी टेंडर बाबतीतील सर्व प्रकारचे नियम, अटी स्पेसिफिकेशन्स व इत्यादीचा पूर्ण अभ्यास करून व निविदेमध्ये नमूद साहित्याचा नमुना मुख्य सफाई अधीक्षक, घनकचरा व्यवस्थापन विभाग यांचेकडे देऊन त्यांचेकडून नमुना योग्य व मान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र घेवूनच टेंडर भरावे. टेंडर उघडल्यानंतर लिफाफ्यामध्ये नमुना योग्य व मान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र नसल्यास निविदा स्वीकारण्यात येणार नाही व कोणत्याही बाबतीतील तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

२) टेंडरसोबत मागितलेली सर्व कागदपत्रे , बयाणा रकमेची पावती वगैरे कागदपत्रे सोबत असणे अनिवार्य आहे.

३) कोणतेही टेंडर कारण न देता मंजूर वा ना मंजूर करणेचे अधिकार मा.आयुक्त सो.म.पा. यांना राहील त्याची कारणे देण्याची जबाबदारी महानगरपालिकेवर राहील.

४) पुरवठा मुदतीत पूर्ण न झाल्यास सुरक्षित रक्कम व बयाणा रक्कम जप्त केले जाईल.

५) मक्तेदाराने पुरवठा केलेला माल समाधानकारक नसल्यास त्याप्रमाणे मक्तेदारास कळवून इतर कोणत्याही मक्तेदाराकडून पुरवठा करून घेण्यात येईल व त्या व्यवहारामध्ये जर महापालिकेचे नुकसान झाल्यास असे नुकसान मूळ मक्तेदाराकडून वसूल करून घेण्यात येईल.

६) मा.केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडील सर्व आवश्यक करविषयक कायदे मक्तेदारास लागू राहतील.

७) काही नैसर्गिक आपत्तीमुळे मक्तेदारास अथवा कामाचे नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी मक्तेदार यांची स्वत:ची राहील.

८) पुरवठा करतेवेळी एखाद्या कामगारास दुखापत झाली अगर मृत्यू आला तर त्यासंबंधी कोणत्याही नुकसान भरपाईची जबाबदारी पूर्णपणे मक्तेदार यांची राहील.

९) टेंडर शर्ती व अटी संबंधात भविष्यात वाद निर्माण झाल्यास मा.आयुक्त, सो.म.पा. निर्णय देतील तो टेंडरदारास बंधनकारक राहील.

१०) सदर कामाबद्दल काही वाद निर्माण झाल्यास तो सोलापूर न्यायकक्षेच्या हद्दीत राहील.

११) मक्तेदाराने द्यावयाचे दर हे सर्व शासकीय करासह असणे आवश्यक आहे.

१२) निविदेबाबत असलेल्या प्रक्रीयेच्या तारखा टेंडरदारांनी स्वत: तपासून घ्यावयाचे आहे. या तारखाप्रमाणे वेळोवेळी प्रक्रिया करावयाची संपूर्ण जबाबदारी टेंडरदाराची आहे.

१३) निविदेबाबतची संपूर्ण माहिती दिलेल्या मुदतीत आगाऊ स्वरूपात मिळवून त्याप्रमाणे कार्यवाही ठेवण्याची जबाबदारी टेंडरदाराची आहे. याबाबत सो.म.पा. घनकचरा व्यवस्थापन जबाबदार असणार नाही.

१४) निविदा प्रक्रियेमध्ये काही तांत्रिक अडचणी अथवा संकेतस्थळावर पुरविणेत येणा-या सेवेमध्ये अडचणी निर्माण झाल्यास याबाबत टेंडरदारांना अडचणी आल्यास टेंडरदारांना सो.म.पा.घनकचरा व्यवस्थापनाकडे कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही. तसेच याबाबत दिवाणी न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.

१५) मक्तेदाराने निविदा मिळाल्यानंतर मुदतीत माल घनकचरा व्यवस्थापन विभाग सोलापूर येथे पोहोच द्यावयाचा आहे.

(शशिकांत भोसले)
सहा. आयुक्त तथा नियंत्रण अधिकारी
घनकचरा व्यवस्थापन विभाग